VOL- XI ISSUE- VII JULY 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# जयक्रांती अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांकरिता पुरविण्यात येणाऱ्या ग्रंथालयीन सेवांच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**श्री.गोविंद यादव कांबळे**
ग्रंथपाल,
जयक्रांती अध्यापक महाविध्यालय,लातूर

**सारांश :-**

*एकविसावे शतक हे माहिती संप्रेषण व तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते.अशा माहिती संप्रेषण व तंत्रज्ञानाच्या काळात सर्व प्रकारच्या शिक्षणात ग्रंथालयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.उच्च शिक्षणात ग्रंथालयाचे महत्त्व अधिक असून विद्यार्थी, अध्यापक तसेच इतर घटक यांना ग्रंथालयातून शिक्षण क्षेत्रातील अद्ययावत ज्ञान,माहिती उपलब्ध होत असते.तसेच इतर वाचन साहित्याचाही पुरवठा ग्रंथालयातून केल्यामुळे सर्व क्षेत्रातील माहिती सहजरित्या सर्वांपर्यंत पोहोचविणे सहज शक्य झाले आहे.त्यामुळे शाळा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अनेक ग्रंथालयीन सेवा पुरविल्या जातात व विद्यार्थीही त्या ग्रंथालयीन सेवांचा उपयोग अध्ययनासाठी, स्वतःचे ज्ञान,माहिती वाढवण्यासाठी करतात.ग्रंथालयाचा वापर,अभ्यासक्रमाशी निगडित ग्रंथ, संदर्भ ग्रंथाचा वापर, संदर्भ साहित्य,अध्यापन साधने, सेवा, ई-ग्रंथालयीन सेवा, ग्रंथालयीन कर्मचारी इत्यादी बाबींचा ग्रंथालयीन वापरातील सेवांमध्ये समावेश होतो.त्यामुळे ग्रंथालय हे प्रशिक्षणार्थ्यांना सहज व जलद माहिती प्रदान करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. त्यामुळे अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांना पुरविल्या जाणाऱ्या ग्रंथालयीन सेवा कोणत्या, त्याचा उपयोग प्रशिक्षणार्थी कसा करतात व ग्रंथालयीन सेवांच्या परिणामकारकता यांचा अभ्यास करण्यासाठी 'जयक्रांती अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांकरिता पुरविण्यात येणाऱ्या ग्रंथालयीन सेवांची परिणामकारकता' हा अभ्यासविषय निश्चित करण्यात आला.*

**प्रस्तावना :-**

शाळा, महाविद्यालयाप्रमाणे अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या शिकण्याच्या गरजा पूर्णकण्यासाठी ग्रंथालयाद्वारे महत्वपूर्ण सेवा पुरविण्यात येतात.संशोधन करण्यासाठी,नोकरीत कौशल्य सुधारण्यासाठी, व्यक्तीच्या व समाजाच्या सर्वांगिण विकासात ग्रंथालय महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असतात.त्यामुळे प्रत्येक शाळा, महाविद्यालय,विद्यापीठात ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध असते. विद्यार्थी, प्रशिक्षणार्थ्यांना वाचनाची सवय लावण्यासाठी, त्यांच्या ज्ञानाचा विस्तार करण्यासाठी,विविध विषयांवरील संशोधन करण्यासाठी ग्रंथालय अत्यावश्यक आहे.याद्दष्टीने प्रशिक्षणार्थ्यांमध्ये संशोधनासाठी, माहिती, ज्ञान मिळविण्यासाठी, वाचनाची व ग्रंथालयाची अभिरुची निर्माण करण्यासाठी, ग्रंथालयातून प्रशिक्षणार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा अभ्यास करून त्यात सुधारणा करण्यासाठी ग्रंथालयीन सेवांचा व त्यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास प्रस्तुत संशोधन विषयात केला आहे.

**समस्या विधान :-**

"जयक्रांती अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांकरिता पुरविण्यात येणाऱ्या ग्रंथालयीन सेवांच्या परिणामकारकतेचा अभ्यास"

**कार्यात्मक व्याख्या :-**

**1.अध्यापक महाविद्यालय**

" जयक्रांती अध्यापक महाविद्यालय,लातूर हे सेवापूर्व प्रशिक्षण देणारे शासनमान्य विनाअनुदानित महाविद्यालय जेथे विद्यार्थी भावी काळातील शिक्षकाची भूमिका निभावण्यासाठी पात्र होतात."

**2.ग्रंथालयीन सेवा**

नवनवीन माहितीचा संग्रह असलेल्या ग्रंथालयातून विद्यार्थ्यांना ज्ञान वाढीसाठी सोयी सुविधा पुरणारे केंद्र म्हणजे ग्रंथालयीन सेवा होय."

सदर संशोधनामध्ये जयक्रांती महाविद्यालयाच्या ग्रंथालामधून पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१.प्रशिक्षणार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या ग्रंथालयीन सेवांचा अभ्यास करणे.

२.प्रशिक्षणार्थ्यांना दिलेल्या सेवांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

३.ग्रंथालयाकडून शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांना अपेक्षित असणाऱ्या सेवांचा अभ्यास करणे.

**परिकल्पना :-**

विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन सुविधा पुरविण्यात आल्या तर त्यांच्या अध्ययनास मदत होईल.

**व्याप्ती व मर्यादा :-**

प्रस्तुत शैक्षणिक संशोधन 2023 ते 2024 या शैक्षणिक वर्षातील जयक्रांती अध्यापक महाविद्यालयामधील प्रथम वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांपुरते व्याप्त आहे.तसेच हे शैक्षणिक संशोधन जयक्रांती अध्यापक महाविद्यालयापुरते मर्यादित आहे.

**संशोधनाची गरज :-**

अध्यापक महाविद्यालयातील ग्रंथालयाकडून प्रशिक्षणार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा कोणत्या आहेत त्यांचा अभ्यास करण्यासाठी, प्रशिक्षणार्थी त्या सेवांचा वापर स्वतःच्या अध्ययनासाठी कसा करतात याचा अभ्यास करण्यासाठी, ग्रंथालयाकडून शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांना अपेक्षित असणाऱ्या सेवांचा अभ्यास करण्यासाठी,तसेच प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या अध्ययनात उपयुक्त असणाऱ्या ग्रंथालयीन सेवेत सुधारणा करण्यासाठी,ग्रंथालयाचा प्रभावी वापर करण्यासाठी प्रस्तुत संशोधन अत्यंत गरजेचे आहे.

**संशोधन कार्यपद्धती :-**

1. **संशोधन पद्धती :** प्रस्तुत शैक्षणिक संशोधनात प्रायोगिक पद्धतीचा वापर करण्यात आला.
2. **माहिती संकलनाचे साधने :**माहिती संकलनासाठी प्रश्नावली, पदनिश्चयन श्रेणी या साधनांचा वापर केला आहे.
3. **नमुना निवड :** या संशोधनासाठी शैक्षणिक वर्ष 2023-2024 मधील प्रथम वर्षातील 110 प्रशिक्षणार्थ्यांपैकी 10 प्रशिक्षणार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.त्यांना प्रश्नावली या साधनाचा वापर करून ग्रंथालयीन सेवासंदर्भात 10 प्रश्न विचारण्यात आले.

**माहितीचे संकलन -**

1. **पूर्व चाचणी (Pre-Test)-** शैक्षणिक वर्ष 2023-2024 मध्ये वर्षाच्या सुरुवातीला प्रशिक्षणार्थ्यांची विषयाच्या संदर्भात प्रश्नावली या साधनाचा वापर करून पूर्व चाचणी (Pre-Test)- घेतली व माहिती संकलन करण्यात आले.
2. **ग्रंथालयीन सेवांचा पुरवठा -** प्रशिक्षणार्थ्यांना ग्रंथालयीन सेवा पुरविण्यात आली.
3. **उत्तरचाचणी (Post-Test) -** प्रशिक्षणार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या ग्रंथालयीन सेवांची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी वर्षाच्या शेवटी त्यांची उत्तरचाचणी (Post - Test) घेण्यात आली व माहिती संकलन करण्यात आले.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

- **संख्याशास्त्रीय परिमाण :**

या शैक्षणिक संशोधनात प्रशिक्षणार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रश्नावली, पदनिश्चयन श्रेणी साधनाद्वारे संकलित केलेल्या माहितीचे शेकडेवारी या संख्याशास्त्रीय परिमाणाचा वापर करून विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.

संकलित माहितीची मांडणी तक्त्याद्वारे करण्यात आली आहे.

**तक्ता क्र.1**

**1.अभ्यासक्रमाशी निगडित किंवा क्रमिक पुस्तके उपलब्ध करून दिली जातात.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| नेहमी | 05 | 30% |
| बहुतेक वेळा | 04 | 30% |
| कधी-कधी | 01 | 20% |

| | | |
|---|---|---|
| **क्वचित** | 00 | 10% |
| **कधीच नाही** | 00 | 10% |
| **एकूण** | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 30% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 30% आहे.

**अन्वयार्थ-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थी ग्रंथालयातील अभ्यासक्रमाशी निगडित किंवा क्रमिक पुस्तकांचा वापर करतात.त्यामुळे त्यांना वाचनाची सवय लागते व विषयाचे अधिक ज्ञान मिळते.

**तक्ता क्र.2**

**ग्रंथालयीन संग्रह व पुरविण्यात येणारी पुस्तके,हस्तलिखिते,मासिके,नियतकालिके, व्हिडिओ,ऑडिओ,डीव्हीडी व अन्य स्वरूपातील सेवा ग्रंथालयाद्वारे पुरविण्यात येतात.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| **नेहमी** | 03 | 30% |
| **बहुतेक वेळा** | 04 | 40% |
| **कधी-कधी** | 02 | 20% |
| **क्वचित** | 01 | 10% |
| **कधीच नाही** | 00 | 00% |
| **एकूण** | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 40% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 30% आहे.

**अन्वयार्थ-** ग्रंथालयीन संग्रह व पुरविण्यात येणारी पुस्तके,हस्तलिखिते, मासिके, नियतकालिके, व्हिडिओ,ऑडिओ,डीव्हीडी व अन्य स्वरूपातील सेवा ग्रंथालयाद्वारे पुरविण्यात आल्यामुळे त्या अध्ययनास उपकारक ठरतात.

**तक्ता क्र.3**

**पुस्तके निवडण्यासाठी ई-तालिकांची सेवा ग्रंथालयात उपलब्ध आहे.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| **नेहमी** | 07 | 70% |
| **बहुतेक वेळा** | 03 | 30% |
| **कधी-कधी** | 00 | 00% |
| **क्वचित** | 00 | 00% |
| **कधीच नाही** | 00 | 00% |
| **एकूण** | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 30% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 70% आहे.

**अन्वयार्थ-** पुस्तके निवडण्यासाठी ई-तालिका सेवेच्या वापराद्वारे पुस्तकांची अनुक्रमणिका पाहून प्रशिक्षणार्थी हवी ती माहिती सहज मिळवितात.त्यामुळे वेळ वाचतो.

**तक्ता क्र.4**

**ग्रंथालयामार्फत संशोधन संदर्भात शैक्षणिक जर्नल्स,प्रबंध,प्रबंधाचे शैक्षणिक संशोधन इ.अद्ययावत वाचन साहित्य उपलब्ध करून देण्यात येते.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| **नेहमी** | 05 | 50% |
| **बहुतेक वेळा** | 04 | 40% |
| **कधी-कधी** | 01 | 10% |
| **क्वचित** | 00 | 00% |
| **कधीच नाही** | 00 | 00% |
| **एकूण** | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 40% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 50% आहे.

**अन्वयार्थ-** संशोधन संदर्भात शैक्षणिक जर्नल्स,प्रबंध,प्रबंधाचे शैक्षणिक संशोधन इ.सेवा

ग्रंथालयामार्फत पुरविण्यात आल्यामुळे अभ्यासाच्या उद्देशाने,विविध विषयांवरील संशोधन करण्यासाठी त्या उपयुक्त ठरतात.

**तक्ता क्र.5**

**ग्रंथालयामार्फत वेब ओपेक,आंतर ग्रंथालयीन देवाण-घेवाण सेवा,रेफरल सेवा,माहितीची निवडक प्रसारण सेवा,बुलेटीन बोर्ड सेवा इत्यादी सेवा पुरवण्यात येतात.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| नेहमी | 06 | 60% |
| बहुतेक वेळा | 03 | 30% |
| कधी-कधी | 01 | 10% |
| क्वचित | 00 | 00% |
| कधीच नाही | 00 | 00% |
| एकूण | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 30% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 60% आहे.

**अन्वयार्थ-** वेब ओपेक, आंतर ग्रंथालयीन देवाण-घेवाण सेवा, रेफरल सेवा,माहितीची निवडक प्रसारण सेवा, बुलेटीन बोर्ड सेवा प्रशिक्षणार्थ्यांना सोयीनुसार वापरता येत असल्याने वेळ वाचून अभ्यासासाठी भरपूर वेळ मिळतो.

**तक्ता क्र.6**

**ग्रंथालयात लेखन सेवा,नियतकालिक लेखांचे निर्देश,सारसेवा पुरविणे,संशोधनाबाबत अद्ययावत माहिती पुरविणे इत्यादी सेवा पुरविण्यात येतात.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| नेहमी | 07 | 70% |
| बहुतेक वेळा | 03 | 30% |
| कधी-कधी | 00 | 00% |
| क्वचित | 00 | 00% |
| कधीच नाही | 00 | 00% |
| एकूण | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 30% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 70% आहे.

**अन्वयार्थ-** ग्रंथालयात लेखन सेवा,नियतकालिक लेखांचे निर्देश,सारसेवा पुरविणे,संशोधनाबाबत अद्ययावत माहिती पुरविणे, संगणकीय नेटवर्क माहितीची प्राप्ती करून देणे इत्यादी सेवा पुरविण्यात येतात.त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या ज्ञानाचा विस्तार वाढतो.

**तक्ता क्र.7**

**ग्रंथालयात इंटरनेट,Wi-Fi सेवांचा पुरवठा करण्यात येतो.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| नेहमी | 09 | 90% |
| बहुतेक वेळा | 01 | 10% |
| कधी-कधी | 00 | 00% |
| क्वचित | 00 | 00% |
| कधीच नाही | 00 | 00% |
| एकूण | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 10% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 90 % आहे.

**अन्वयार्थ-** ग्रंथालयातील इंटरनेट,Wi-Fi सेवांच्या पुरवठ्यामुळे विषयाबद्दल अधिकाधिक माहिती कमी वेळात आणि सहज प्राप्त होते व अध्ययन अधिक चांगले होते.

**तक्ता क्र.8**

**प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ग्रंथ व माहितीची व साधने यांची मदत ग्रंथालयाद्वारे करण्यात येते.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| नेहमी | 08 | 80% |
| बहुतेक वेळा | 02 | 20% |
| कधी-कधी | 00 | 00% |
| क्वचित | 00 | 00% |

| | | |
|---|---|---|
| **कधीच नाही** | 00 | 00% |
| **एकूण** | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 80% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 20% आहे.

**अन्वयार्थ-** प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयाद्वारे ग्रंथ, माहिती व अन्य साधने पुरविल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या विषयाचे अधिक सखोल ज्ञान मिळते व त्यांची संशोधन वृत्ती वाढते.

**तक्ता क्र.9**

**ग्रंथालयातील वाचनालयाचा वापर करतात.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| **नेहमी** | 04 | 40% |
| **बहुतेक वेळा** | 03 | 30% |
| **कधी-कधी** | 01 | 10% |
| **क्वचित** | 01 | 10% |
| **कधीच नाही** | 01 | 10% |
| **एकूण** | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 30% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 40% आहे.

**अन्वयार्थ-** ग्रंथालयातील वाचनालयाचा अधिकाधिक वापर केल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना वाचनाची सवय लागते,वाचनात अभिरुची निर्माण होते व विषयाचा सखोल अभ्यास होतो.

**तक्ता क्र.10**

**अभ्यासक्रमाशी निगडित किंवा क्रमिक पुस्तके,संदर्भपुस्तके,अन्य साहित्य,संगणकीय व तांत्रिक सेवा पुरविण्यात ग्रंथपाल साहाय्य करतात.**

| श्रेणी | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|
| **नेहमी** | 08 | 80% |
| **बहुतेक वेळा** | 02 | 20% |
| **कधी-कधी** | 00 | 00% |
| **क्वचित** | 00 | 00% |
| **कधीच नाही** | 00 | 00% |
| **एकूण** | 10 | 100% |

**निरीक्षण-** बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांनी बहुतेक वेळा व नेहमी हा प्रतिसाद नोंदवला आहे.

बहुतेक वेळा या प्रतिसादाचे प्रमाण 20% आहे तर नेहमी या प्रतिसादाचे प्रमाण 80% आहे.

**अन्वयार्थ-** अभ्यासक्रमाशी निगडित किंवा क्रमिक पुस्तके,संदर्भपुस्तके,अन्य साहित्य,संगणकीय व तांत्रिक सेवा पुरविण्यात ग्रंथपाल महत्वपूर्ण भूमिका निभावतात.

**निष्कर्ष :-**

1.प्रशिक्षणार्थ्यांना ग्रंथालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा फायदा अध्ययनासाठी होतो.

2.ग्रंथालयामार्फत पुरविण्यात येणारे संदर्भ ग्रंथ प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या विषयाचे अधिकचे ज्ञान घेण्यासाठी उपयुक्त आहेत.

3.ग्रंथालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या ई-सेवांचा फायदा प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार करता येतो.

**संदर्भ :-**

1. www.researchgate.net
2. https://marathivishwakosh.org/66108/
3.https://infinitylearn.com/surge/english/essay/essay-on-library-and-its-uses/
4.https://mr.wikipedia.org/wiki/%E0%A4%97%E0%A5%8D%E0%A4%B0%E0%A4%82%E0%A4%A5%E0%A4%BE%E0%A4%B2%E0%A4%AF